# अनोळखी व्हिडीओ कॉल उचलू नका - बिचेवार

**चिंचवड, दि. ११ (वार्ताहर) -** समाजात सध्या सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. यासाठी प्रतिभा महाविद्यालयाने प्रतिभा फिनिशिंग स्कूल या स्वतंत्रपणे प्रशिक्षण देण्यासाठी विभाग स्थापन करून क्विकहिल फाऊंडेशनच्या वतीने सायबर शिक्षा व सायबर सुरक्षा उपक्रमाचे आयोजन करून तज्ज्ञाकरवी सुमारे १५० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. सामंजस्य करारही या वेळी करण्यात आला.

या वेळी क्विकहील फाउंडेशनच्या अधिकारी सुगंधा दाणी, मृणाल महापुसकर, प्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, विभाग प्रमुख डॉ. जयश्री मुळे, डॉ. हर्षिता वाच्छानी, प्रा. सुप्रिया गायकवाड उपस्थित होते.

सायबर तज्ज्ञ नितेश बिचेवार म्हणाले, इंटरनेट, व्हॉटसअॅप, युट्युबमुळे माहितीजाळ खुले झाले असले तरी सततच्या मोबाइल हाताळल्यामुळे मुलांच्या व्यक्तिमहत्त्व विकासावर, स्वभाव धारणेवर व कौटुंबिक संबंधावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. लक्षात ठेवा चुकीचे काम कराल, तर भावी आदर्श आयुष्याला मुकाल. शिक्षण घ्यायला आला आहात तर जे जे आवश्यक आहे तेच घ्या. सुरक्षितता बाळगणे अत्यंत महत्त्वाचे असून फेसबुक प्रोफाइल लॉक करा, पासवर्ड तीन आकडी ठेवू नका, अनोळखी व्हिडीओ कॉल घेऊ नका, सोशल मिडीयावर सातत्याने दक्षता बाळगा अडचण भासल्यास महाराष्ट्र सायबरचा कोर्स आहे, त्याची माहिती आत्मसात करा.

सायबर तज्ज्ञ आशा सानप म्हणाल्या, ऑनलाइन शॉपिंग, शादी डॉटकॉम, नोकरी डॉटकॉम आदी आपली एक आभासी ओळख धारण करून सायबर विश्वास मुक्तसंचार करून अनेक फसवणुकीच्या तक्रारी पोलिसात दाखल आहेत. अॅप डाऊनलोड करताना खात्री करावी. क्रेडीट व डेबिट कार्डद्वारे व्यवहार करताना काळजी घ्यावी. आपला ओटीपी तिऱ्हाइतांना शेयर करू नका, ऑनलाइन पेमेंटकरून फसवणूक होऊ शकते. आधारकार्ड, पॅनकार्डचे महत्त्व समजून घ्यावा.



**चिंचवड :** सायबर शिक्षा व सायबर सुरक्षा उपक्रमास उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व मान्यवर.